# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी ४११ ०१८.

## जाहीर प्रकटन

**जाहिरात क्रमांक १४७ दिनांक :- १८/११/२०११**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर वर्ग ४ (गट ड) चे संवर्गात र.रु.५२००-२०२०० ग्रेडवेतन १९०० या वेतनश्रेणीत **"फायरमन"** अभिनामाची रिक्त पदे भरणेकामी खालील नमूद केलेल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून सरळसेवा प्रवेशाने नोकरी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र | पदनाम | जात /गट प्रवर्ग | | | | | | | | | | समांतर आरक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा (अ) | भ.ज (ब) | भ.ज (क) | भ.ज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण | माजी सैनिक | प्रकल्प-ग्रस्त | भूकंप ग्रस्त | होम-गार्ड |
| १ | फ़ायरमन | ०३ | ०५ | ०२ | -- | ०२ | -- | -- | ०२ | १५ | २९ | ०४ | ०१ | ०१ | ०२ |
| एकूण | | ०३ ✓ | ०५ ✓ | ०२ ✓ | -- | ०२ ✓ | -- | -- | ०२ ✓ | १५ ✓ | २९ | ०४ | ०१ | ०१ | ०२ |

१) **<u>शैक्षणिक अर्हता</u>** :-

१) इ.१० वी परीक्षा उत्तीर्ण

२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठ्यक्रम पूर्ण केलेला असावा.

**मार्गदर्शक सूचना / अटी :-**

१) जाहिरातीचे दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम राहतील)

२) उमेदवार महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. त्याबाबत रहिवासी दाखला (Domecile Certificate) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

३) निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अंनियो-१००५/१२६/सेवा-४,दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (Defined Contribution Pension System) लागू राहील.

४) मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. मागासवर्गीय उमेदवारांनी निवड झालेनंतर नियुक्तीपूर्वी ६ महिन्याचे आत जातीचे वैधता प्रमाणपत्र नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे (पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे) दाखल करणे आवश्यक राहील,अन्यथा निवड रद्द समजण्यात येईल.

५) अर्हताधारक उमेदवारांनी आपले अर्ज ए-४ आकाराच्या कागदावर सोबतचे विहित नमुन्यात टंकलिखीत करुन पत्रव्यवहारासाठीचे पत्त्यामध्ये पिनकोड नंबरसह असलेला परिपूर्ण अर्ज मा.आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे- मुंबई रस्ता,पिंपरी,पुणे १८ या पत्त्यावर ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत (दिनांक ४/१२/२०११ पर्यंत) पोष्टाद्वारे पाठवावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या तसेच विहित नमुन्यात नसलेल्या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही. अर्जाच्या पाकिटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा. तसेच पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज, पत्रव्यवहारासाठीचे पत्त्यामध्ये पिनकोड नंबर नमुद नसलेले अपूर्ण अर्ज, किंवा चुकीचे भरलेले अर्ज,वय,शैक्षणिक अर्हता,गुणपत्रक,जातीचा दाखला,अनुभव इ.कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती (True Copies) नसलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

६) वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या धोरणानुसार महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,दिनांक ०१/०७/२००५ नुसार अपत्याबाबतचे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र (सोबत विहित नमुन्यात) र.रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करुन प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) रिक्त पदांच्या तुलनेत अधिक अर्ज प्राप्त झाल्यास गुणवत्तेचे योग्य ते निकष लावून मुलाखतीस बोलाविण्यात येणाऱ्या उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यासाठी पात्रता (चाळणी) परीक्षा घेण्यात येईल. सदर परीक्षा घेण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना राहतील.

८) मुलाखतीस बोलविणेत आलेल्या उमेदवारांना मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

९) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस / मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास,गैरवर्तन करतांना आढळल्यास,दबाव तंत्राचा वापर करतांना आढळल्यास उमेदवारी आपोआप रद्दबादल होईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्या उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१०) जन्मदिनांक,शैक्षणिक अर्हता,अनुभव व मागासवर्गीय असल्यास जातीचा दाखला इत्यादींचे प्रमाणपत्रांचे साक्षांकित छायाप्रती अर्जासोबत जोडाव्यात. मूळ प्रमाणपत्र जोडू नयेत.

११) टपाल खात्याची दिरंगाई व पत्रव्यवहाराच्या पत्त्यामध्ये पिनकोड नंबर नमुद नसलेले अर्ज, कोणत्याही मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. अशा अपात्र ठरलेल्या अर्जांच्या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१२) सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अधिकृत अर्जाचा नमूना महापालिकेच्या <u>www.pcmcindia.gov.in</u> या Website वरुन Download करुन घेता येईल.

१३) निवड झालेल्या उमेदवारास महापालिकेने ठरवून दिलेले बंधपत्र करुन देणे आवश्यक राहील.

१४) उमेदवाराने अर्जावर नमूद केलेल्या ठिकाणी स्वतःचा फोटो चिकटवणे आवश्यक आहे.

१५) माजी सैनिक,प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त यांच्यासाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. **(माजीसैनिक,प्रकल्पग्रस्त,भूकंपग्रस्त असलेबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.)**

१६) सदर पदांच्या लेखी स्पर्धा परिक्षेतून गुणानुक्रमे पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या शारीरिक क्षमता चाचणी परीक्षा घेतल्या जातील.

<u>टीप</u> :-

रिक्त पदांची अनुशेषाची आकडेवारी कमी-जास्त होऊ शकते.

सही/-
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

जावक क्रमांक प्रशासन/३अ/कावि/८६१/२०११,
दिनांक १८/११/२०११.

सहाय्यक आयुक्त,प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८.**
**उमेदवाराने करावयाचा अर्जाचा नमुना**

पासपोर्ट आकाराचे छायाचित्र

प्रति,
मा.आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

**विषय :- " ------------------" पदासाठी अर्ज.**
संदर्भ :- जाहिरात क्रमांक १३० /२०११,दिनांक / / २०११.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय जाहिरातीस अनुसरुन "--------------" पदासाठी आवश्यक ती अर्हता मी धारण करीत असून,त्यासाठी विहित नमुन्यात हा अर्ज सादर करीत आहे.

१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :- ------------------------------------------
(आडनाव प्रथम) ------------------------------------------

२) पत्रव्यवहारासाठी पत्ता ------------------------------------------
------------------------------------------

पिनकोड | | | | | | |

३) जन्मदिनांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |

४) लिंग पुरुष स्त्री

५) जात --------------------

६) जातीचा प्रवर्ग (संबंधित रकान्यात (✓) अशी खूण करावी)

| अजा | अज | विजा (अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

७)अन्य प्रवर्ग असल्यास संबंधित रकान्यात (✓) अशी खुण करावी.

| प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | माजी सैनिक | खेळाडू | होमगार्ड |
|---|---|---|---|---|
| | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | उत्तीर्ण परिक्षेचे नाव | मंडळाचे नाव / विद्यापिठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

९) तांत्रिक पात्रता :- ------------------------------------------
------------------------------------------

१०) अनुभव :- ------------------------------------------
------------------------------------------

मी वर नमूद केलेली माहिती बरोबर असून त्यापृष्ट्यर्थ सोबत खालील प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडल्या आहेत.

उमेदवाराची स्वाक्षरी.

( नाव ------)

दिनांक :-
सहपत्रे :- १) ---------- २)----------- ३) ----------

र.रू. १००/- स्टॅम्प पेपरवर

**<u>महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम, २००५ नुसार</u>**

## प्रतिज्ञापत्र

मा. श्री./ श्रीमती /कुमारी -------------------------------------------------

श्री. ---------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/ मुलगी/पत्नी, वय ---------------------वर्षे, राहणार, -------------------------------------------------------यांव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी --------------------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ------------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------------------आहे. ( असल्यास, जन्म दिनांक नमूद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यात पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

सही/-

( नाव :- )

दिनांक :-

नोटरी - सही / शिक्का